महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग,
तिसरा मजला, मुख्य इमारत, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
दूरध्वनी क्र ०२२-२२७९४१५०/२२०२ ४३३०. Email ID : doesttclass1.wrd@maharashtra.gov.in

क्रमांक: एसएलएस २०२२/प्र.क्र. १३६/भाग-२/२०२२/आ(वर्ग-१) दिनांक : ०५ सप्टेंबर, २०२४.

प्रति,
१) श्री.महेंद्र ब. नाकील, सेवानिवृत्त अधीक्षक अभियंता.
२) श्री.राजेंद्र अंबादास शिंपी, सेवानिवृत्त अधीक्षक अभियंता.
३) श्री.किरण रामभाऊ हातगावकर, सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता.
४) श्री.भास्कर पंढरीनाथ चाटे, सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता.
५) श्री.संजय देवदासपंत वानखडे, सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता.
६) सर्व संबंधित कार्यकारी अभियंता (स्थापत्य).

**विषय :** कार्यकारी अभियंता (स्थापत्य) संवर्गाची ज्येष्ठता यादी प्रसिध्द करणे आणि अधीक्षक अभियंता (स्थापत्य) पदावरील पदोन्नतीबाबतच निवेदने.

उपरोक्त विषयाबाबत कार्यकारी अभियंता (स्थापत्य) संवर्गातील कार्यरत व सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी वैयक्तिकपणे व एकत्रितरित्या, तसेच सहायक अभियंता श्रेणी-१ संघटनेने निवेदने सादर केली आहेत. सदर निवेदनांद्वारे मा.न्यायनिर्णय व १९८३ च्या ज्येष्ठतेच्या विनियमनातील तरतुदीनुसार सहायक अभियंता श्रेणी-१ संवर्गाच्या अधिकाऱ्यांची पदोन्नती नियमित करुन त्यांना ज्येष्ठतेचा दिनांक देवून ज्येष्ठता सूचीमध्ये समावेश करणे, दिनांक ३१.०७.२०२३ च्या परिपत्रकान्वये प्रसिध्द केलेल्या कार्यकारी अभियंता (स्थापत्य) संवर्गाच्या दिनांक ०१.०१.२००१ ते ०१.०१.२०२० रोजीच्या सुधारित तात्पुरत्या ज्येष्ठता सूचीवरील घेण्यात आलेले आक्षेप निकाली काढणे, सदर ज्येष्ठता वरील आक्षेपांचे निराकरण केल्याबाबतचे दिनांक ०१.०४.२०२४ रोजीचे पत्र परत घेणे इत्यादी मुद्दे मांडण्यात आले आहेत.

२. सदर निवेदनांच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) संवर्गाचे दिनांक १९.१२.१९७० चे सेवाप्रवेश नियम आणि दिनांक ०७.०४.१९८३ चे ज्येष्ठतेचे विनियमन रद्द झाले नसून अद्याप प्रचलित आहेत. दिनांक ०७.०४.१९८३ च्या ज्येष्ठतेच्या विनियमांच्या आधारे कार्यकारी अभियंता

(स्थापत्य) संवर्गाच्या सन २००१ ते २०१८ या कालावधीत निवडसूचींचे पुनर्विलोकन करुन नियमित होणाऱ्या अधिकाऱ्यांची सेवाज्येष्ठता निश्चित करुन दिनांक ३१.०७.२०२३ रोजीच्या परिपत्रकान्वये दिनांक ०१.०१.२००१ ते ०१.०१.२०२० या कालावधीची सुधारित तात्पुरती ज्येष्ठतासूची प्रसिध्द करुन अभावित सेवा असणाऱ्या अधिकाऱ्यांना ज्येष्ठतेचा दिनांक प्रदान करण्यात आला आहे. तसेच सदर ज्येष्ठता सूचीबाबत उपस्थित करण्यात आलेल्या आक्षेपांचे दिनांक ०१.०४.२०२४ च्या पत्रान्वये निराकरण करण्यात आले आहे.

३. कार्यकारी अभियंता (स्थापत्य) संवर्गाच्या सन १९७० ते १९९३ च्या ज्येष्ठतेबाबत माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत माहितीची मागणी केल्यानंतर नस्तीचा शोध घेण्याच प्रयत्न केल्यानंतर नस्ती उपलब्ध होत नसल्याचे निर्दशनास आले आहे. यानुषंगाने दाखल करण्यात आलेल्या अपिलाच्या सुनावणीमध्ये, त्या कालावधीत ज्येष्ठता सूचीबाबतचे कार्यासन बंद केल्यामुळे किंवा ज्येष्ठतेबाबतचा अभिलेख "क" वर्ग स्वरुपात जतन करण्यात येत असल्याने नियमानुसार ५ वर्षानंतर नष्ट केल्याची शक्यता असल्याने किंवा मंत्रालयाला लागलेल्या आगीनंतर जलसंपदा विभागाचे स्थलांतर अन्य ठिकाणी झाल्याने अभिलेख गहाळ झाला असल्याची शक्यता निदर्शनास आणून देण्यात आली होती. सदर अभिलेख केव्हा गहाळ/ नष्ट झाला आहे त्याबाबत कोणतीही नोंद अभिलेख्यात उपलब्ध नाही.

४. कार्यकारी अभियंता (स्थापत्य) संवर्गाच्या ज्येष्ठतेबाबत मा.सर्वोच्च न्यायालय, मा.उच्च न्यायालय आणि मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणांनी वेळोवेळी पारीत केलेले आदेश आणि सेवाप्रवेश नियम व ज्येष्ठतेच्या विनियमनातील तरतुदी विचारात घेवूनच कार्यवाही करण्यात आली असून याबाबत दिनांक ३१.०७.२०२३ च्या परिपत्रकामध्ये आणि दिनांक ०१.०४.२०२४ रोजीच्या पत्रामध्ये स्पष्टता करण्यात आली आहे. तरीदेखील काही अधिकाऱ्यांकडून निवेदने सादर करुन एकच मुद्दा वारंवार उपस्थित करण्यात येत असून शासकीय वेळेचा अपव्यय करण्यात येत आहे. तसेच सदर अधिकाऱ्यांकडून वकील व सामाजिक कार्यकर्ते यांच्यामार्फत नोटीशी देण्यात येत असून, वृत्तपत्रांमध्येही शासनविरोधी वस्तुनिष्ठ नसलेल्या बातम्या प्रसिध्द करण्यात येत आहेत. याव्यतिरिक्त कार्यकारी अभियंता (स्थापत्य) संवर्गातील अधिकाऱ्यांकडून विविध न्यायालय/ न्यायाधिकरणामध्ये १६ प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत. तरीही कार्यकारी अभियंता (स्थापत्य) संवर्गाच्या ज्येष्ठतेबाबत नियमोचित कार्यवाही केलेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांवर पूर्वीच्या न्यायालयीन निर्णयांचा चुकीचा अर्थ काढून नाहक व हेतुपुरस्सरपणे वैयक्तिक स्वरुपात तथ्यहिन

आरोप करुन त्यांचे मानसिक खच्चीकरण करुन दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे निदर्शनास येत आहे. सदर बाब अनुचित असून शासकीय कर्मचाऱ्यांना अशोभनीय अशी आहे. त्यामुळे कार्यकारी अभियंता (स्थापत्य) पदाच्या आतापर्यंत निश्चित करण्यात आलेल्या सेवाज्येष्ठतेबाबत यापूर्वीची प्रकरणे न्यायप्रविष्ठ असल्याने याप्रकरणी जोपर्यंत न्यायनिर्णय होत नाही तोपर्यंत याविषयाबाबत प्राप्त होणाऱ्या अर्जांची दखल घेणे तर्कसंगत व न्यायोचित होणार नाही. म्हणून या विषयाबाबत यापुढे आपणाकडून होणाऱ्या पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

५. वरील सर्व बाबींचा सारासार विचार करता कार्यकारी अभियंता (स्थापत्य) संवर्गाच्या ज्येष्ठतेबाबत प्रकरणे न्यायप्रविष्ठ असल्याने अर्जदारांनी न्यायालयीन निर्णयाची प्रतिक्षा करणे उचित राहील.

६. सदर पत्र जलसंपदा विभागाच्या www.wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी ते संकेतस्थळावरुन उपलब्ध करुन घ्यावे.

**( डॉ.सचिन कावळे )**
**कार्यासन अधिकारी, जलसंपदा विभाग.**

प्रत,
१) ॲड आदित्य तळपाडे, १, तळ मजला, हिरालाल मेंशन, पीठा स्ट्रीट, फोर्ट, मुंबई- ४००००१.
२) ॲड प्रतिक कारंडे, एच-२४, नुतन नगर, गुरुनानक रोड, बांद्रा (पश्चिम), मुंबई ४०००५०.
३) ॲड शुभांकर आव्हाड, ८, चंद्रकंस अपार्टमेंट, न्यू पंडीत कॉलनी लेन, नाशिक- ४२२००८.
४) ॲड प्रदीप रविंद पाटील, ४४, ३रा मजला, अजय दीप, २४०, पेरीन नरीमन स्ट्रीट, फोर्ट, मुंबई- ४००००१.
५) ॲड श्रीनिवास एस. वाघ, फ्लॅट नं. २, पृथ्वी विहार अपार्टमेंट, प्लॉट नं. ३२, साईबाबा मंदीर जवळ, ज्योती नगर, छत्रपती संभाजीनगर- ४३१००५.
६) श्री.शशीकांत सरदार, मुख्य संपादक, साप्ताहिक पोलीस दक्ष, अभान पार्क, कोलशेत रोड, ठाणे (पूर्व).

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी,
१) सर्व मुख्य अभियंता (स्थापत्य)/ अधीक्षक अभियंता (स्थापत्य).
२) कार्यासन आ(वर्ग-१) संग्रहार्थ.